
ISSN 2320-4439
RNI No. MAHAUL03008/13/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

Special Issue II Aug.2020



ART'S I COMMERCE I SCIENCE I SOCIAL SCIENCE I
EDUCATION I MANAGEMENT I MEDICAL I ENGINEERING & IT
LAW I PHARMACY I PHYSICAL EDUCATION I AGRICULTURE I
JOURNALISM I MUSIC I LIBRARY SCIENCE I

Editor
Dr. Sadashiv H. Sarkate
E-mail : powerofknowledge3@gmail.com
www.powerofknowledge.co.in

अनुक्रमणिका



| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| 1 | Gender differences pertaining to work life balance | Nikhat Tabasum<br>Dr. B S Hugar | 1-7 |
| 2 | E-Learning - A New Direction Of Digital India | Adv. Dr.shivangi k.zarkar | 8-15 |
| 3 | Diara Land In The Holy Ganga Of Bihar | Dr. Alpna Jyoti | 16-19 |
| 4 | The Impact Of Training And Development On Organizational Overall Performance In It Industry | Shilpa S. Hiregoudar<br>Dr. Rekha N. Patil | 20-31 |
| 5 | During Pandemic Covid 19 Psychological Behavior Of School Students On Light Of Online Education | Urna Bhattacharjee | 32-34 |
| 6 | A Study On The Impact Of Performance Management Systems On Employee's Performance In Degree Institutions In Kalaburagi | Archana V. Padgul (M Kinagi)<br>Dr. Rekha N. Patil | 35-43 |
| 7 | Reading habit among Mahila Mahavidhyalay Georai :A Case Study. | Dr.Sanjay L. Bhedekar | 44-46 |
| 8 | Library Accessibility To The Researchers And E-Resources Based Information Services | Dr.sanjay Bhedekar | 47-49 |
| 9 | The Ombudsman Scheme for Non-banking Financial Companies 2018-An Overview | Dr.Swati Joshi | 50-55 |
| 10 | Ego As Premise Of Objectivism In Ayn Rand's Theory | Dr.Pradip.G.Sonawane | 56-58 |
| 11 | Review on-Hydrothermal synthesis of Cobalt Ferrite and substituted Cobalt Ferrite | Santosh M. Arade | 59-63 |
| 12 | Agricultural problems in Marathwada Region | Dr. Syed Tanvir Badruddin | 64-67 |
| 13 | Attractive result for some non linear functional differential and intergral equation | Mr.P. M. More | 68-78 |
| 14 | Ichalkaranji as a commercial tourism center in Kolhapur district (ms): a geographical study | Dr. Dilip A. Gade | 79-87 |
| 15 | Digital transformation of academic libraries: Opportunities and Challenges. | Sarika Bhagwanrao Rengunthwar | 88-90 |
| 16 | Non performing assets performance in banking sector in india | Prof. Dr.Dattatraya S. Tambe | 91-97 |
| 17 | "Migration Pattern of Agricultural Works in Beed Taluka" | Dr.Ghodke Jitendra Vitthalrao | 98-101 |
| 18 | संत तुकाराम महाराज यांच्या अभंगातील पर्यावरणीय संदेश डॉ. धनंजय वसंत वाघमारे | डॉ. धनंजय वसंत वाघमारे | 102-106 |
| 19 | महात्मा गांधी यांचे सामाजिक विचार | प्रा.मोहन बाबुराव चव्हाण | 107-113 |
| 20 | संस्कृत नाट्यरंगभूमीः उगम आणि विकासः | मोरेश्वर चंभरू बर्वे | 114-119 |



Off. Principal
Late. N.P.W. College
Distt. Bhandara

| | | | |
|---|---|---|---|
| 44 | दलित कवितेची शैली: काही निरीक्षणे | सुषमा दिनेश जाधव | 258-269 |
| 45 | लावणी : एक नृत्यप्रकार | प्रा.डॉ.अनिल बळीराम बांगर | 270-276 |
| 46 | विज्ञानकथाकार : डॉ. जयंत नारळीकर | प्रा. सौ. सुनिता प्रदिप रंगारी | 277-284 |
| 47 | 'भिन्न' कादंबरीतील स्त्री व्यक्तिरेखा | कु. गायकवाड सविता श्रीपती | 285-292 |
| 48 | अन्वा मंदिरावरील एकमेव अद्वितीय कामशिल्प | प्रा. डॉ. अरविंद सोनटक्के, | 293-297 |
| 49 | महात्मा गांधी यांचे भारतीय स्वातंत्र्यलढयातील कार्य | श्री. लहु बाबुराव राठोड | 298-300 |
| 50 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक धोरणाला प्रभावीत करणाऱ्या घटकांचा चिकित्सक अभ्यास | प्रा. डॉ. प्रमिला डी. भोयर, | 301-306 |
| 51 | प्रवासवर्णन प्रेरणा प्रयोजन व्याप्ती व वेगळेपणा | सुप्रिया राजाराम गांवकर | 307-312 |
| 52 | माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या डाव्या व उजव्या मेंदूच्या प्रबळतेचा अभ्यास | डॉ. जयश्री बळीराम पाटील | 313-318 |
| 53 | कोप्पेश्वर (खिद्रापूर) मंदिरातील शिल्पांचा बोध. | आदित्य फडके | 319-328 |


Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara

Late N. P. W. College Lakhani Distt. Bhandara
Ref No.
Dt.

# बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक धोरणाला प्रभावीत करणाऱ्या घटकांचा चिकित्सक अभ्यास

प्रा. डॉ. प्रमिला डी. भोयर,
(सहा. प्राध्यापक) इतिहास विभाग प्रमुख
स्व.निर्धन पाटील वाघाये कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
लाखनी, जि.भंडारा–४४१८०४

...वणा :–

विषमताग्रस्त समाजरचनेत अस्पृश्यांच्या वाटयास नरकतुल्य यातना व ...तुल्य जीवन हया दोन्ही बाबी आलेल्या होत्या. शतकानुशतके भारतातील ...त (अस्पृश्य) समाज कसे जीवन जगत होता हे मनुस्मृतीतील तथा पेशवेशाहीतील ...श्यांवरील अन्याय अत्याचार युक्त बखर वाङ्‌मयातील कथामूधन ऐतिहासिक ...ल्यामधून ग्रॅड डफ प्रस्तुत रिपोर्टस मधून प्रतिबिंबित होणाऱ्या मानवतेस ...कित करणाऱ्या अमानुश घटनांमधून दिसून येते. दलित वर्गाला न्याय हक्क ...वून देणाऱ्या विसाव्या शतकातील भारतातील युगप्रवर्तक क्रांती सुर्य महामानव ...बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आमुलाग्र परिवर्तनवादी आहेत. त्यांच्या चळवळी ...ह्यातर मानवकल्याणकारी आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य केवळ ...जसुधारणेचेच नाही., अस्पृश्यता निर्मूलनाचेच नाही तर त्यांचे कार्य एक ...भूत अनुपमेय क्रांतीकार्य आहे. जीवनाच्या सर्वांगास परिसस्पर्शाचे ते कार्य ...हे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य केवळ संघर्ष लढा अथवा चळवळी या ...रूपाचेच नाही तर त्यांचे कार्य एक अद्‌भूत 'अस्पृश्यांचा मुक्तिसंग्राम' असे डॉ. ...बासाहेब आंबेडकरांनी चालविलेल्या संघर्षांश यथार्थ असे नाव दिले आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक धोरण हे त्यांच्या जीवनविशयक ...त्वज्ञानाची क्रियात्मक बाजू प्रकट होते. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे एक साधन ...णून त्यांचा पाठपूरावा केला. हे आंबेडकरांनी ओळखले होते. म्हणून त्यांनी ...पल्या आयुष्यभराच्या मानवमुक्तीच्या युगप्रर्वतक कार्यात शिक्षणाला अग्रक्रम ...ला.

## ...बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक धोरणाला प्रभावित करणारे घटक:–

...) अस्पृश्यता :–

युगानुयुगे सामाजिक गुलामगिरीमध्ये अस्पृश्यतेचे, लांच्छणास्पद, ...रस्कारणीय, अपमानित, गावकुसाबाहेरच्या वस्तीत राहणारे, पोटभर अन्न नाही, ...वाऱ्यासाठी जागा नाही. अश्या उष्टया, खरकटया जिवनावर जगणाऱ्या अस्पृश्य



Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara
Late N.P.W. College Lakhani Distt. Bhandara
Ref. No.
Dt.

(महार) समाजातील डॉ. आंबेडकरांचा जन्म झाला. त्यामुळे त्यांना पावलोपावली अपमान व मानहानी सहन करावा लागला. "एकदा बाल भीम व थोरला भाऊ आनंद कोरेगावी बैलगाडीतून वडिलांना भेटावयास निघाले. मुलांचे रूबाबदार कपडे पाहून गाडीवाणाला वाटले की, ही मुले कुण्या सुखवस्तु गृहस्थाची असावीत पण नंतर मुलांच्या संभाशणावरून त्याने हेरले की, ही मुले महाराची आहेत. आपली गाडी महारांच्या पोराने विटाळली म्हणून त्याच्या राग अनावर आला व त्याने टोपलीतून कचरा फेकावा तसे मुलांना गाडीबाहेर फेकले."[१]

"त्या दिवशी बाल भीमाला आपल्या हिन, दिन व केविलवान्या जीण्याची जाणीव झाली की, आपणास वेगळे का बसविण्यात येते. शाळेत बसायला गोणपाट का न्यावे लागतात, काही शिक्षक आपल्या पुस्तकांना हात का लावीत नाही, आपणास शाळेत प्यायला पाणी इतर विद्यार्थ्यासारखे का मिळत नाही. एक ना दोन अनेक घटनांची मालीकांच त्यांच्या डोळयापूढे उभी राहीली व त्यांना कळुन चुकले की, साऱ्या विटंबनाचे मुळ आपणास लोक अस्पृश्य मानतात ह्यत आहे. हिंदु धर्माच्या रूढींनी लादलेल्या अस्पृश्यतेच्या कलंकात आहे. सहाजिकच डॉ. आंबेडकरांना हिंदु धर्माबद्दल बालपणापासून तिरस्कार वाटू लागला आणि ही तिरस्काराची भावना दिवसेंदिवस वाढत गेली."[२]

पुढे बाबासाहेबांनी विद्येची खडतर तपस्या केली. जगातील श्रेश्ठ विद्यापीठातून अतुच्च पदव्या मिळविल्या. त्यांनी अर्थशास्त्र, समाजशास्त्र, मानवशास्त्र, इतिहास, तत्वज्ञान, धर्म राजकारण व कायदा इ. विशयाचा सखोल अभ्यास केला व आपल्या प्रकांड विध्वत्तेचा उपयोग त्यांनी शेकडो वर्शापासुन अस्पृश्यतेचा कलंक माथी घेवून बहिष्कृतांचे, लाचारीचे अपमानकारक जीने जगणाऱ्या अस्पृश्य समाजात माणूस म्हणून जगण्याचा हक्क मिळवून देण्याकरीता केला. एवढेच नव्हे तर "तिरस्कारणीय गुलामगिरी नी अमाणुश अन्याय त्यांच्या गर्तेत पिचत पडलेल्या ज्या समाजात मी जन्माला आलो. त्या समाजाची गुलामगिरी नष्ट करण्यास अपयशी ठरलो तर स्वत:ला गोळी घालीन." अशी घनघोर प्रतिज्ञा केली व अस्पृश्यांना माणूसकीने हक्क मिळवून देण्याकरीता आयुश्यभर विविध पातळयांवर लढे दिले. त्यांना माणुसकीचे हक्क प्रदान करून दलितांचे बाबा झाले. जो धर्म अशिक्षितांना अशिक्षित रहा. निर्धनांना निर्धन रहा. अशी शिकवन देतो. तो धर्म नसुन शिक्षा आहे. ज्या धर्मात अमंगल पशुचा स्पर्श झाला असता चालतो. पण माणसाचा स्पर्श चालत नाही. तो धर्म नसून वेडगळपणा आहे. असे डॉ.आंबेडकरांनी अस्पृश्यतेविशयी उद्‌गार काढले.

**२) वडिल रामजी सुभेदार :—**



Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara
Late N. P. W. College, Lakhani
Ref No.-----
Dt.
Distt. Bhandara

डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे आयुश्य घडविण्यात त्यांचे वडिल रामजी सपकाळ यांचे अत्यंत मोलाचे योगदान आहे. रामजी सपकाळ हे व्यवसायाने लश्करात शिक्षक होते. त्यामुळे स्वाभाविकच आपल्या मुलांमध्ये विद्येची अभिरूची उत्पन्न व्हावी त्यांचे चरित्र उज्वल व्हावे. याकरीता ते, अत्यंत दक्ष असत. रामजी सुभेदार अत्यंत तडफदार महत्वाकांक्षी, विद्याव्यासंगी, सुशील व धार्मिक वृत्तीचे होते. ते मुलांना रामायण, महाभारतातील कथा वाचून दाखवित. ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम यांसारख्या संत, कविच्या काव्याचे ते मुलांकडून पाठांतर करवून घेत. त्यामुळे बालपणापासुन डॉ. आंबेडकरांवर उत्तम संस्कार झाले. अभंगाच्या उत्तम वाङ्मयाच्या निरंतर पठणामुळे त्यांच्या भाषेला, विचारांना प्रभावी वळण मिळाले. पुढिल आयुश्यात डॉ. आंबेडकरांनी काढलेल्या मराठी पाक्षिक व साप्ताहीकांच्या संपादकीय कतृत्वाचा पाया हा अशाप्रकारे बालवयातच घातला गेला होता.

रामजी सुभेदारांना भीम हाच आपल्या जीवनातील आशा वाटत असे. ''भीमाच्या परिक्षेतील साध्या यशाने त्यांना समाधान लाभत नसे रात्रंदिवस भीमाच्या उत्कर्शाची तळमळ लागली होती. भीमाला मात्र हया तळमळीचा अर्थ उमगत नसे. भीम म्हणे, ''मी दरवर्शी परिक्षा बिनधोकपणे उत्तीर्ण होतो. मग माझ्यामागे अभ्यासाचा तगादा वडिलांनी का लावावा.''३

पण हया कळकळीचा परिणाम भीमाच्या जीवनावर अप्रत्यक्षपणे घडून येत होता. भीमाला वाचनाची आवड निर्माण झाली. तो पुस्तकांसाठी हट्ट धरू लागला. हालाखीच्या परिस्थितीत पैसे असोत की, नसोत रामजी सुभेदार भीमाला पुस्तक आणून देण्याकरीता घराबाहेर पडत. आपल्या मुलींकडून पैसे उधार घेत प्रसंगी मुलीचे दागिणे गहाण ठेवून सुभेदारांनी भीमाच्या पुस्तकाचा हट्ट पुरवीत. ''असा प्रेमळ पिता फारच थोडयांना लाभत असेल. असे माझे मन मला ग्वाही देते. माझ्या अल्लड स्वभावामुळे त्यावेळी त्यांच्या प्रेमळपणाची मला किंमत कळली नाही.''४ असे पुढिल आयुश्यात बाबासाहेब वडिलांची आठवण करून गहीवरीत असत.

अशाप्रकारे बाबासाहेबांनी पुढे आपल्या आयुश्यात जे अफाट वाचन केले, विद्याव्यासंग व प्रकांड पांडित्य संपादन केले त्याची बिजे रामजी सुभेदारांनी पेरली.

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तिन गुरू :—
बुध्द, कबिर आणि फुले

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या आयुष्यात बुध्द, कबिर आणि फुले हयांना आपले गुरू मानले. या तीन गुरूंनी आपले आयुष्य घडविले असे बाबासाहेब म्हणत असत.



Off. Principal
M.P.W. College, Lakhani
Ref No.
Dt.

भीमराव मॅट्रीकची परिक्षा उत्तीर्ण झाल्यावर यशाप्रित्यर्थ एक समारंभ करण्यात आला. तेव्हा पुढिल शिक्षणास मदत करण्यास धावणारे गुरूवर्य कृष्णाजी अर्जुन केळूस्कारांनी भीमाचे अभिनंदन करून त्यांनी स्वत: लिहीलेले बुध्दचरित्र भीमाला बक्षिस दिले. डॉ. आंबेडकर मुंबईतील पुरंदर स्टेडियमवर २८ ऑक्टोबर १९५४ साली केलेल्या भाशणात या घटनेचा उल्लेख करून म्हणतात —

"हे पुस्तक वाचल्यानंतर माझ्या मनात काही निराळाच प्रकाश पडला. राम, लक्ष्मण, सिता वनवासात गेले धोब्याच्या सांगण्यावरून रामाने केलेला सितेचा त्याग, कृश्णाचा सोळा सहस्त्र बायका ह्या गोष्टी काहीतरी भयंकरच वाटल्या. हया गाष्टी माझ्या मनाची पकड धरेणात, परंतु बुध्द धर्माच्या माझ्या मनावर कायमचा ठसा पडला. व माझी अशी ठाम खात्री झाली आहे की, जगाचे कल्याण फक्त बुध्द धर्मच करू शकेल. हिंदू लोकांना आपले राश्ट्र जगवायचे असेल तर बुध्दधर्मच स्विकारला पाहीजे असे माझे नेहमी सांगणे आहे."[५]

डॉ. बाबासाहेबांचे दुसरे गुरू कबिर होते. कबिरांविशयी सांगतांना डॉ. आंबेडकर म्हणतात की, "माझ्या मताप्रमाणे कबिराला बुध्दाच्या तत्वज्ञानाचे खरे रहस्य कळले. मी मोठा कोणालाच म्हणत नाही. गांधीना मी महात्मा म्हटले नाही. कारण कबिराने म्हटले आहे की, माणूस होना कठिण है। तो साधु क्या बने। जो माणूस झाला नाही तो महात्मा कसा होईल."[६]

"माझे तिसरे गुरू म्हणजे ज्योतीबा फुले होय. ब्राम्हणेत्तरांचे खरे गुरू तेच होते. शिंपी, कुंभार, न्हावी, कोळी, महार, मांग, चांभाराना माणुसकीचे धडे फुल्यांनीच दिले आणि शिकविले. पूर्वीच्या राजकारणात आम्ही ज्योतीबाच्या मार्गानेच जात होतो. मराठे आमच्यातुन फुटले. कोणी कॉंग्रेसमध्ये उष्टे खाण्यासाठी गेले. त्यापैकी आमचे रा.व.बोले हिंदुमहासभेत गेले ते येथे हजर आहतच. कोणी कोठेही जावोत पण आम्ही मात्र ज्योतीबांच्या मागे जावू. पण ज्योतीबांचा मार्ग सोडणार नाही. हे असे माझे तीन गुरू आहेत. त्यांच्या शिकवणुकीने माझे आयुष्य घडले आहे."[७] असे आपले आयुष्य घडविणाऱ्या गुरूविषयीचे आदरयुक्त उद्‌गार डॉ. आंबेडकरांनी या भाषणामध्ये काढले आहेत.

४) ग्रंथ हेच गुरू :—

अमेरिकेतील अध्ययन काळात प्रा.सेलीग्मन, प्रा.जॉन डयूई, गोल्डनविजर यासारख्या विव्दान प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाचा डॉ. आंबेडकरांवर लाभ झाला. त्यामुळे त्यांच्या अध्ययनाला शिस्त लागली आणि उत्तम ग्रंथाची ओळख होऊ शकली. कोलंबिया विद्यापिठाचे ग्रंथानी समृध्द ग्रंथालय पाहून त्यांनी काय वाचू आणि काय लिहू असे वाटले. व ग्रंथवाचनाचे अतोनात वेड लागले. इतकेच नव्हे



Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara
Late N.P.W. College Lakhani Distt. Bhandara

तर असे ग्रंथ आपल्या मालकिचे असावे म्हणून काटकसरीने अर्धपोटी राहून त्यांनी ग्रंथ विकत घेण्यास सुरूवात केली. हे ग्रंथवेड पुढे आयुश्यभर तसेच राहीले. ''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ग्रंथवेडाची परीसीमा म्हणजे त्यांनी आपल्या प्राणापेक्षाही प्रिय ग्रंथासाठी कर्ज काढून बांधलेले ग्रंथाचे घर 'राजगृह' आजही डौलाने मिरवींत आहे. हया राजगृहात डॉ. आंबेडकर सन्यस्तासारखे आयुश्यभर राहीले आणि निश्ठेने ज्ञानसाधना केली.''[८]

त्याच्या एकाकी जीवनाबद्दल कोणी सहानुभूती दाखवू लागला, तर ते म्हणत, ''अरे तुम्ही खुळे आहात लौकिक कार्यात मी एकटा होतो, खरे पण मी एकाकी कधीच नव्हतो. माझ्या सोबतीला जगातले सर्व थोर विचारवंत उपस्थित असत. मला वाटेल तेव्हा निकट येत. मला उपदेश करीत, धीर देत. माझ्या जीवनकार्याला दिशा दाखवित आणि स्पूर्ती देत. तेच माझे गुरू, तेच माझे मित्र, त्यांनीच मला घडविले.[९]

निष्कर्ष :–

युगानुयुगे सामाजिक गुलामगिरीमध्ये अस्पृश्येतेचे, लांच्छनास्पद, तिरस्कारणीय, अपमानीत गावकुसाबाहेरच्या वस्तीत राहणारे, पोटभर अन्न नाही,, निवाऱ्याची जागा नाही अस्पृष्य समाजात डॉ. आंबेडकरांचा जन्म झाल्यामूळे अगदी बालवयात त्यांनी अस्पृश्यता व जातीभेदाचे दाहक चटके सहन करावे लागले. अस्पृश्यांना माणूसकीचे हक्क मिळवून देण्याकरीता आयुष्यभर विविध पातळयांवर लढे दिले, थोडक्यात डॉ. आंबेडकरांना अस्पृश्यता हा प्रभावित करणारा घटक होता.

डॉ. आंबेडकरांचा आयुष्य घडविण्यात त्यांचे वडिल रामजी सपकाळ यांचे अत्य मोलाचे योगदान आहे. सुभेदारांना भीम हाच आपल्या जीवनातील आशा वाटत असे. सुभेदार भीमाला पुस्तक आणून देण्यासाठी कर्ज काढून देत असत. 'असा प्रेमळ पिता फारच थोडयांना लाभत असेल असे माझे मन मला ग्वाही देते. ' बाबासाहेबांनी पुढे आपल्या आयुश्यात प्रकांड पांडीतय संपादन केले त्याचे बिजे रामजी सुभेदारांनी पेरली.

डॉ. आंबेडकरांनी आपल्या आयुष्यात बुध्द, कबिर आणि फुले हयांना आपले गुरू मानले या तीन गुरूंनी आपले आयुष्य घडविले असे बाबासाहेब म्हणत असत. 'हिंदू लोकांना आपले राष्ट्र जगवायचे असेल तर बुध्दधम्म स्विकारला पाहीजे असे माझे नेहमीं सांगणे आहे.' म्हणून १९५६ साली बाबासाहेबांनी आपल्या लाखो अनुयायांसह बौध्द धम्माची दिक्षा घेतली व साऱ्या जगाला स्वातंत्र, समता, बंधुता व सामाजिक न्यायाचा पुरस्कार केला ही जगातील महान क्रांतीच होय.



Off. Principal
Late. N.P.W. Coll...
Late N. P. W. College ... Dist. ...

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शैक्षणिक कार्याला प्रभावित करणारा सर्वात महत्वाचा घटक म्हणजे त्यांनी ग्रंथ हेच गुरू मानले. ग्रंथाविशयी बोलतांना म्हणतात की, 'मी एकदा वाचावयास बसलो की माझ्या साऱ्या शक्ती एकवटल्या जातात. मी रात्रभर वाचीत व लिहीत असलो तरी, थोडाही थकवा येत नाही. माझी स्मरणशक्ती एवढी तल्लक झाली की, अमुक ग्रंथावरील महत्वाचे लिखाण किंवा अमुक ग्रंथाच्या अमक्या पानावर अमक्या ओळीत हे वाक्य आहे हे मी अचुकपणे सांगू शकतो'. हयावरून बाबासाहेबांची ग्रंथसंपदा करून येते. ग्रंथासाठी बाबासाहेबांनी राजगृहाची निर्मिती करून जवळपास २० ते २२ हजार ग्रंथ आपल्या स्वतःच्या मालकीची होती. एवढा ग्रंथवेडा जगात बाबासाहेबांशिवाय सापडणे कठिण आहे. अशी माझी खात्री आहे.

संदर्भ सुची :—


१) अस्पृश्यता निवारणाचा पोरखेळ : ब. भा. ३ जुन १९२७

२) कीर, धनंजय : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई आ. १ पृ. क्र. १८

३) तत्रैव, पृ. क्र. ५४५

४) बागुल, बापुराव : 'आंबेडकर भारत', राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १९८१ पृ. क्र. ११

५) केळकर, भा.कृ. : 'भारत भुशण डॉ. आंबेडकर' सुगावा प्रकाशन, पुणे (१९९४) पृ. क्र. ६५

६) घोडेस्वार देवीदास : दलितांचे शिक्षण (अनु.),समता प्रकाशन, समता सैनिक दल, नगापूर आ.१(१९९४) पृ.क्र.१४२

७) तत्रैव, पृ.क्र. १४२

८) तत्रैव, पृ.क्र. १४२

९) पाणतावणे, डॉ.गंगाधर : पत्रकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर, अभिजीत प्रकाशन, नागपूर आवृत्ती १(१९८७) पृ. क्र. ३५६

१०) रेगे. शा. श. : डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ज्ञानाचा सागर 'योजना' पाक्षीक, डॉ. आंबेडकर विशेशांक प्रकाशन माहिती आणि प्रसारण मंत्रालय भारत सरकार, मराठी आवृत्ती १ मे १५ डिसेंबर पृ. क्र. ५७


■■■

Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara